# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### कोरोना व्यतिरिक्त आजारी रुग्णाला रुग्णालयांनी प्रवेश नाकारल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याबाबत

**(१) ३२३१ (२९-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी येथील रहिवाशी श्री.जयदीप जयवंत यांना दिनांक १४ एप्रिल, २०२० रोजी हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना त्यांच्या पत्नीने वाशी सेक्टर-१० येथील पालिका दवाखान्यात नेले असता त्यांना प्रवेश नाकारण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयवंत यांना काही खाजगी रुग्णालयातही नेले असता सर्व रुग्णालयांनी सध्या फक्त कोरोना बाधीतांवर उपचार करत असून त्याव्यतिरिक्त रुग्णांना उपचार देण्यास असमर्थता दाखवून त्यांना रुग्णालयात घेण्यास नकार दिल्याने त्यांना नेरूळ येथील डी.वाय. पाटील रुग्णालयात नेले असता बराच वेळ गेल्याने त्यांची प्राणज्योत गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोना व्यतिरिक्त असलेल्या आजारावर उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयातील डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) श्री.जयदीप जयवंत यांना त्यांच्या नातेवाईकांनी रूग्णवाहिकेतून महात्मा गांधी रूग्णालय, वाशी येथे नेले असता, दोन-तीन मिनीटामध्ये लगेचच त्यांना रूग्णालयाच्या गेटवरून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील सार्वजनिक रूग्णालयात नेले.

• तथापि, वाशी येथील सार्वजनिक रूग्णालयाचे रुपांतर कोविड रूग्णालयामध्ये करण्यात आल्याने महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा डी.वाय.पाटील रूग्णालय नेरूळ, सार्वजनिक रूग्णालय ऐरोली व माता बाल रूग्णालय बेलापूर येथून देण्यात येत होत्या.

• सदर रूग्णास डी. वाय. पाटील रूग्णालय, नेरूळ येथे उपचाराकरीता नेले असता, तेथे त्यांना मयत झाल्याचे घोषित करण्यात आले.

• प्राथमिक चौकशीअंती खाजगी रूग्णालयाने श्री.जयदीप जयवंत यांना दाखल करून घेण्यास नकार दिला, अशी वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नाभिक समाज बांधव सलून व्यवसाय बंद असल्यामुळे आर्थिक अडचणीत आल्याबाबत

**(२) ४०२४ (१७-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नाभिक समाज बांधवांचे सलून व्यवसाय गेल्या तीन ते चार महिन्यापासून कोरोना संकटामुळे बंद असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील सलून व्यवसाय आर्थिक अडचणीमध्ये सापडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ६० टक्के सलुन धारक हे भाड्याच्या सलूनमध्ये काम करीत आहेत व भाड्याच्या घरामध्ये वास्तव्यास असून तीन ते चार महिने सलून बंद असल्यामुळे आर्थिक संकटामुळे राज्यात सर्व व्यावसायिक आत्महत्या करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन सलून व ब्युटी पार्लर व्यावसायिकांचे तीन महिन्याचे वीज बिल, घर भाडे तसेच त्यांच्यावर असलेली कर्ज माफ करुन आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना तात्काळ दहा लाखाचे आर्थिक पॅकेज देणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सलून व्यवसायिकांना तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०६-०६-२०२३) :** (१), (२) व (३) कोरोना साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मार्च, २०२० पासून भारत सरकारने देशभर सक्तीने लॉकडाऊन लागु केला. या काळात देशातील सर्वच उद्योग /व्यवसाय बंद ठेवण्यात आले होते. सलून व्यावसायिकांचा ग्राहकांशी प्रत्यक्ष संबंध येत असल्याने साथरोगाचा प्रसार टाळण्यासाठी सलून व्यवसायही कोरोना कालावधीत दीर्घकाळ बंद करण्यात आले होते. त्यामुळे इतर सर्व छोट्या व्यावसायिकांप्रमाणे सलून व्यावसायिकांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला हे खरे असले तरी, त्यामुळे सलून व्यावसायिक आत्महत्या करीत असल्याबाबतचे कोणतेही निवेदन/ तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.

कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर शासनाने लॉकडाऊन अंशत: व तद्नंतर पूर्णत: शिथील केल्यानंतर इतर व्यवस्यांप्रमाणेच सलून व्यवसायही पूर्ण क्षमतेने सुरु झालेला आहे. अशा स्थितीत सलून व्यवसायाला आर्थिक पॅकेज देण्याचा प्रश्न उध्दवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी महापालिकेच्या ५० घंटागाड्या विनावापर असल्याबाबत

**(३) ८४८८ (१८-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील ओला आणि सुका कचरा उचलण्यासाठी महापालिकेने सुमारे ३ कोटी २५ लाख रुपये खर्च करून नविन ५० घंटागाड्या माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान खरेदी केल्या असून अद्याप सदर गाड्या महापालिकेच्या कोंबडपाडा येथील भांडार गृहात वापराविना असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घंटागाड्यांची निगा व दुरुस्तीसाठी मनपा प्रशासनाने तब्बल १ कोटी ६ लाख २० हजार रुपये किंमतीची निविदा काढली असून संबंधित निविदेची चौकशी मा.मुख्यमंत्री तसेच पालकमंत्री यांचेमार्फत करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच वापराविना असलेल्या घंटागाड्या महानगरपालिका सेवेत केव्हापर्यंत रुजू होणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) : (**१), (२) व (३) भिवंडी शहरातील ओला आणि सुका कचरा उचलण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे रुपये ३ कोटी २५ लाख रक्कमेच्या ५० घंटागाड्या माहे मार्च, २०२० मध्ये खरेदी केल्याची बाब भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविली आहे. त्यापैकी रुपये ३ कोटी २५ लाख प्रदान करण्यात आले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने सदर वाहने वापरात आल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी निगा/ दुरुस्तीसाठी रुपये १ कोटी ६ लाख २० हजार रक्कमेची निविदा दिनांक ०१/०१/२०२१ रोजी प्रसिध्द केली असून त्यास प्रतिसाद न मिळाल्याने चौथ्यांदा फेर निविदा दिनांक २६/०४/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

दरम्यान भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत खरेदी केलेल्या घंटागाडी वाहनांची निगा/दुरुस्तीची निविदेबाबत विविध तक्रारी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्याकडे लोकप्रतिनिधीकडून प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती असून संबंधितांना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

घनकचरा संकलनासाठी खरेदी करण्यात आलेली घंटागाडी वाहने खाजगी वाहनचालकांची सेवा घेऊन सुरु करण्याची निविदेत मागील माहे मार्च, २०२० नंतर Covid Lockdown मुळे प्रतिसाद न मिळाल्याने, तद्नंतर फेरनिविदेव्दारे पात्र निविदाकार यांची निविदा स्थायी समितीसमोर प्रस्तावित आहे.

सदरची मंजूरी प्राप्त झाल्यावर ५० घंटागाड्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कार्यान्वित करण्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मराठा आरक्षण लागू करुन उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत

**(४) ८५५७ (११-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६५३७ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा समाजाला आरक्षण लागू करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक १५७३७/२०१९ व इतर याचिकांन्वये आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती दिली असल्याने दिनांक ९ सप्टेंबर, २०२० नंतर या कायदयाची अंमलबजावणी तात्पुरती स्थगित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन मराठ्यांना आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये युक्तिवाद देताना कमी पडल्याचे निदर्शनास आले असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याने मराठा समाजातील विविध संघटनेने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिल्यामुळे शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी व पुढील दिशा ठरवण्यासाठी दिनांक ११ मे, २०२१ रोजी माजी मुख्य न्यायाधिश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे तसेच शासनाने राज्य मागासवर्ग आयोग नेमून त्यांच्या शिफारशी राष्ट्रीय मागास आयोगाकडे सादर करून मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याच्या पर्यायाचा विचार केला आहे काय,

(३) असल्यास, मराठा आरक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यामुळे प्राध्यापक भरती, शिक्षक भरती, प्राचार्य भरती, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची भरती अशा विविध शासकीय पदांच्या भरती प्रक्रियेवर परिणाम होणार असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मराठा समाजातील शासकीय सेवेमध्ये सन २०१९ ते २०२० मध्ये तलाठी, महावितरण, एमएमआरडीए, एमपीएससी अशा विविध शासनाचे विभागामार्फत एसईबीसी प्रवर्गातून निवड झालेल्या सर्व उमेदवारांना तात्काळ शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत विधानपरिषद सदस्यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ मे, २०२१ रोजी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने आजवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच १०२ वी घटना दुरुस्ती नंतर राज्य शासनाला आरक्षण देण्याबाबत अधिकार कायम राहतात हे केंद्र शासनाने संसदेत व न्यायालयामध्ये स्पष्ट केले असून केंद्र शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये फेरविचार याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व या निर्णयामुळे मराठा समाजाला आरक्षण लागू करता येणार नसल्यामुळे मराठा समाजाचे हित जपले जावून त्यांना आरक्षण लागू करुन उमेदवारांच्या तात्काळ नियुक्त्या करण्याकरीता शासनाने त्वरित निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी व पुढील दिशा ठरविण्यासाठी दिनांक ११ मे, २०२१ रोजी माजी मुख्य न्यायाधिश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. प्राप्त झालेल्या शिफारशींनुसार शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात फेर याचिका दाखल केली आहे. तसेच, भोसले समितीने सुचविलेल्या इतर उपाययोजनांवरही कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) एसईबीसी प्रवर्गातून निवड झालेल्या सर्व उमेदवारांना तात्काळ शासन सेवेत सामावून घेणेबाबतचे मा.विधान परिषद सदस्यांनी दिनांक १२ मे, २०२१ रोजी मा.मख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या मुख्यमंत्री सचिवालय कार्यालयात आढळून आले नाही. तथापी, विषय साधर्म्य असलेले मा.विनायकराव मेटे, विधान परिषद सदस्य यांचे दिनांक ०९ जून, २०२१ चे पत्र प्राप्त झाले आहे.

(४) हे, खरे आहे.

(५) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशान्वये एसईबीसी आरक्षण अधिनियम २०१८ अवैध ठरवून मराठा आरक्षण रद्द केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची समीक्षा करण्यासाठी माजी न्यायाधीश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेली असून समितीच्या इतर शिफारशीनुसार मराठा समाजास सोयी-सुविधा देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०५/०५/२०२१ च्या निर्णयाच्या अनुषंगाने ईएसबीसी व एसईबीसी उमेदवारांना नियुक्त्या देण्यासंदर्भात दिनांक ०५/०७/२०२१ व दिनांक १५/०७/२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील जमिनी मूळ मालकाला देण्याबाबत

**(५) १०२२५ (०६-१०-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील ८ गावांची शेकडो एकर जमीन सन १९६० साली केंद्र शासनाच्या केमिकल ॲण्ड इंटरमिडीएट प्रकल्प कामगार वसाहतीसाठी महाराष्ट्र शासनामार्फत भूसंपादन कायदा १८९४ (भाग१) नुसार संपादित केल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १६०० एकर जमिनीपैकी १०६१ एकर जमीन एचओसीएल प्रकल्पाने आपल्या नावे ठेवून ५३९ एकर जमीन केंद्र व राज्य शासनाच्या इतर प्रकल्पाला दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एचओसीएल प्रकल्पाने उद्दीष्टासाठी पूर्ण जमिनीचा ताबा न घेतल्याने शिल्लक जमिनीचा ताबा मूळ शेतकऱ्यांना द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासन व बाधित शेतकरी यांच्या अनेकवेळा बैठका होऊनही मूळ मालकाला जमिनी परत न दिल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रसायनी परिसरातील जमिनी मूळ मालकाला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) व (६) एचओसीएल प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या परंतु कंपनीच्या वापरात नसलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याच्या मागणीबाबत मा.मंत्री (महसूल) यांचेकडे दिनांक ११/१०/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत "लोकप्रतिनिधींच्या मागण्यांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांनी तपासणी करुन ३ आठवड्यात अहवाल शासनास सादर करावा" असे तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी निर्देश दिले आहेत.

तसेच तत्कालीन मा.राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे दिनांक १०/१०/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत "शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत मा.लोकप्रतिनिधी, हिंदुस्थान ऑर्गेनिक केमिकल्स लि. चे सक्षम अधिकारी, शेतकरी व जिल्हाधिकारी, रायगड यांचे प्रतिनिधी यांची समिती स्थापन करावी व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी," असे निर्देश दिले.

सदर शासन निर्देशाप्रमाणे गठित समितीने पुढीप्रमाणे अहवाल सादर केला आहे:- "प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या ताब्यात/वहिवाटीत असलेल्या जमीनी परत करणे अथवा त्यांचा मोबदला देण्याबाबत जोपर्यंत शासनस्तरावर निर्णय होत नाही तोपर्यंत BPCL प्रकल्पाबाबत कोणताही प्रकारचा निर्णय घेण्यात येऊ नये"

तथापि, हे स्पष्ट करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.३६३८/१९९७ (स्पेशल लिव्ह पिटिशन क्र.२६०४/१९९२) केरळ राज्य विरुध्द एम. भास्करन पिल्लाई व इतर या प्रकरणात दिनांक ०५/०५/१९९७ रोजी संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या भूसंपादीत जमीनी मूळ भूधारकाला परत देता येणार नाहीत असे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणातील भूसंपादीत जमीनी खातेदारांना परत देणे तसेच त्याचा मोबदलाही शक्य होत नाही. तसेच BPCL हा प्रकल्प राष्ट्रीय महत्वाचा प्रकल्प असल्यामुळे याबाबतची संबंधितांची मागणी मान्य करता येत नाही.

---

## मौजे दहिसर (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील खारफुटी वनस्पतींचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत

**(६) ११७४५ (२२-११-२०२२) श्री.विलास पोतनीस : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ६३३७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये भौतिकरित्या हद्द नसल्यामुळे मौजे दहिसर, ता.बोरीवली येथील खारफुटी वनस्पतींची स्थानिक भूमाफियांकडून अनधिकृतपणे आणि बेसुमार वृक्षतोड सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, बोरीवली यांना सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशान्वये तहसिलदार, बोरीवली यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ३२४६/२००४ रुपांतरीत जनहित याचिका ८७/२००६ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशान्वये, तसेच पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगर जिल्हा यांमधील भौतिकरित्या हद्द निर्माण/ निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक ०५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांना नियमानुसार कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येवूनही अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय, केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिरा-भाईदंर आणि मुंबई उपनगर जिल्हयांमध्ये भौतिकरित्या हद्द निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित मंडळ अधिकारी, बोरीवली, नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांच्या कार्यालयातील परिरक्षण भूमापक, कांदळवन कक्षाचे प्रतिनिधी आणि तक्रारदार यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी इत्यादींच्या उपस्थितीत दिनांक ०३/१२/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, तक्रारीत नमूद मौजे दहिसर येथील स.नं.३४३ व ३४४पै, न.भू.क्र.१; स.नं.३४०/२, न.भू.क्र.१५१७; स.नं.३३६/२, न.भू.क्र.१५०९ व स.नं.३३०/१, न.भू.क्र.१५५२ या चारही ठिकाणी कांदळवनाची तोड किंवा कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही.

सबब, मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.३२४६/ २००४, रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशान्वये तसेच पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) मिरा-भाईदंर आणि मुंबई उपनगर जिल्हा यांमधील भौतिकरित्या हद्द निर्माण / निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक ०५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांना नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार ठाणे जिल्ह्यातील भाईंदर गावच्या सिमेलगत खाडी असून खाडीलगतच्या दक्षिणेकडील बाजूस नगर भूमापन दहिसरची हद्द येते. नगर भूमापन दहिसर येथील MRSAC यांच्याकडील कांदळवन दर्शविणारा नकाशा तसेच नगर भूमापन अधिकारी, बोरीवली कार्यालयातील दहिसर गावाच्या भूमापनावेळीचे मूळ आलेख पाहता, सदर खाडीलगत सर्वे नं.३४३ पै. व ३४४ पै. या मिळकतीस न.भू.क्र.१ असा नगर भूमापन क्रमांक देण्यात आलेला आहे. सदर मिळकतीची हद्द नगर भूमापनाचे वेळी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे मौजे भाईंदर या गावच्या हद्दीलगत नगर भूमापन दहिसर येथील न.भू.क्र.१ ची हद्द यापुर्वीच तयार झालेली असल्याने नव्याने हद्द निश्चित करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) ११९०९ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागांतील सुमारे ४३ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याने कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागांतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) :** (१) माहे डिसेंबर, २०२१ अखेरीपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध आस्थपनेवर वर्ग १ ते ४ मध्ये एकूण १,३६,९४१ इतकी पदे मंजूर असून, त्यापैकी ९१,८४६ इतकी पदे भरली असून ४५,०९५ इतकी पदे रिक्त असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गाची रिक्त असलेली पदे सातत्याने भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. तथापि, खालील कारणांमुळे पदे रिक्त राहतात असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे:-• कार्यरत कर्मचारी सातत्याने पदोन्नत/सेवानिवृत्त होत असतात.

• रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया होऊन प्रत्यक्ष नियुक्तीसाठी उमेदवार प्राप्त होण्यास काही वेळ अपरिहार्य असतो.

• सद्य:स्थितीत कोरोना विषाणूच्या जागतिक महामारीमुळे रिक्त पदे भरण्यास विलंब झाला आहे.

• आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या आदेशानुसार महापालिकेत महसुली आणि खर्चातील काटकसरीचे धोरण अवलंबण्यात आल्यामुळे नवीन सर्वसाधारण पदभरती करण्यात आलेली नाही.

• अत्यावश्यक सेवेमध्ये त्या-त्या विभागाद्वारे बाह्यस्त्रोतांद्वारे कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आलेले आहे.

• यांत्रिकीकरणामुळे काही पदे कालबाह्य झालेली आहेत.

---

## कल्याण पश्चिमेतील गौरीपाडा तलावाच्या किनारी ८५ कासव मृतावस्थेत आढळून आल्याबाबत

**(८) १२८८९ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि ठाणे) पश्चिमेतील गौरीपाडा तलावाच्या किनारी ८५ कासव मृतावस्थेत आढळून आल्याचे दिनांक २२ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सन २०२०-२०२१ या कालावधीत कोरोना कालावधीत गौरीपाडा परिसरात काही पक्षी मृतावस्थेत आढळून आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी प्राणी व पक्षी मृतावस्थेत आढळण्याची करणे काय आहेत तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) दिनांक २२ जानेवारी, २०२२ ते दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत कल्याण (जि.ठाणे) येथिल गौरीपाडा तलावाच्या किनारी मृतावस्थेत आढळून आलेले ८२ कासव वन विभागाने ताब्यात घेतले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) सदर कासवांचे शवविच्छेदन सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (वन्यजीव) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी केले असता त्यांचा मृत्यू हा Bacterial Origin Enterities And Septicemia मुळे झाला असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

या अनुषंगाने गौरीपाडा येथिल तलावाच्या साफसफाई व स्वच्छता राखण्याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील महेंद्री जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्याबाबत

**(९) १३०७८ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील महेंद्री या जंगल क्षेत्रातील ७ गावांनी ठराव कराव महेंद्री जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्याची मागणी दिनांक २४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महेंद्री जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) अमरावती जिल्ह्यातील ६७.८२ चौ. कि.मी. क्षेत्र दिनांक १३/०९/२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये महेंद्री संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर क्षेत्रातील काही भागास अभयारण्य म्हणून घोषीत करण्याची शक्यता पडताळणी करुन शासनास अहवाल सादर करण्याकरिता दिनांक ०१/०२/२०२२ रोजी वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांच्या अध्यक्षेखाली उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारावर राज्य वन्यजीव मंडळाच्या १९ व्या बैठकीमध्ये महेंद्री संवर्धन राखीव क्षेत्रात वन्यजीव व्यवस्थापनाचे उपक्रम दिर्घ कालावधीसाठी राबविणे अशा उपक्रमांचा या क्षेत्रातील वनस्पती व

वन्यप्राण्यांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करावा अशी शिफारस मंडळाने केली. त्यानुसार महेंद्री संवर्धन राखीव क्षेत्रास अभयारण्य घोषित करण्याबाबत मंडळाने शिफारस केलेली नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून मराठी विषयातील पदव्युत्तर पदवीधारक बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांना अतिरिक्त दोन वेतनवाढ देण्याबाबत

**(१०) १३३५७ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा व्यवहार जास्तीत जास्त सुलभ, सुटसुटीत आणि अर्थपूर्ण भाषेत व्हावा व मराठी भाषेचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे, याकरीता मान्यताप्राप्त विद्यापीठातून मराठी भाषा विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (मराठीसह एम.ए.) प्राप्त करणाऱ्या महानगरपालिका अधिकारी/ कर्मचारी यांना सन २०११ पासून दोन अतिरिक्त वेतनवाढ देण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास शासनाने, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली असतानाही टिळक विद्यापीठ अभिमत विद्यापीठ नसल्याचे कारण देवून या विद्यापीठातून मराठी विषयासह पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकारी/ कर्मचारी यांना दोन अतिरिक्त वेतनवाढ बृहन्मुंबई महानगरपालिकेडून नाकारण्यात आली असल्याचे दिनांक ९ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची मान्यता असलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून मराठी विषयातील पदव्युत्तर पदवीधारक बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांना अतिरिक्त दोन वेतनवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (**१) हे खरे आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा दिनांक १२/०१/२०१८ रोजीचा ठराव व नगरविकास विभागाचा दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयामधील निर्देशानुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी देऊन त्यानंतर सदर योजना रद्द करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ शासन मान्यताप्राप्त विद्यापीठ नसून अभिमत विद्यापीठ असल्याने या विद्यापीठातून एम.एम. (मराठी) पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांकरीता महानगरपालिका ठरावानुसार दोन अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय नाहीत.

यास्तव दोन अतिरिक्त वेतनवाढी दिल्या असल्यास त्या पूर्वलक्षी प्रभावाने वसुल करण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाने दिनांक ३१/०७/२०१४ रोजी परिपत्रक निर्गमित केले. तथापि, दोन कर्मचारी संघटनांनी मा.औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांच्या अनुषंगाने सदर परिपत्रकास दिनांक १८/१०/२०१४ रोजी स्थगिती देण्यात आली. सदर दोन्ही याचिका मा.औद्योगिक न्यायालयाने फेटाळल्या.

मा.औद्योगिक न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात कर्मचारी संघटनांनी मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले असून, त्याबाबतचा अंतिम आदेश प्रतिक्षाधीन आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भातील व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारी करिता केलेली शुल्कवाढ कमी करण्याबाबत

**(११) १३८९७ (२५-०८-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील राखीव व बफर झोन असलेल्या वन क्षेत्रातून व्याघ्र दर्शन करण्याकरीता वन विभागामार्फत विविध भागात जंगल सफारी करण्याची व्यवस्था आवश्यक शुल्क आकारुन करण्यात येत असून, जंगल सफारीकरता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वन विभागाने दरवाढ केल्यामुळे पर्यटकांना आर्थिक भार येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जंगल सफारी करिता शुल्कामध्ये दरवाढ केल्यामुळे जंगल सफारी पर्यटन व्यवसायावर याचा परिणाम होऊन पर्यटन क्षेत्र बंद होण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भातील व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारी करिता शुल्कामध्ये केलेली दरवाढ कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१),(२) व (३) विदर्भात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच / बोर व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प व नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आहेत. सदर व्याघ्र प्रकल्पातील राखीव व बफर झोन असलेल्या वन क्षेत्रातुन व्याघ्र वन्यजीव दर्शन करण्याकरिता वन विभागामार्फत विविध क्षेत्रात जंगल सफारी करण्याची व्यवस्था आवश्यक शुल्क आकारुन करण्यात येते.

महाराष्ट्र वन्यजीव (संरक्षण) नियम, २०१४ चे कलम क्रमांक १८ (४) अनुसार व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान व्याघ्र राखीव क्षेत्रामधील प्रवेशाचे नियमन करते.

दरवर्षी मजुरीमध्ये तसेच महागाई भत्यामध्ये २ वेळा होणारी वाढ,पेट्रोल व डिझेलची झालेली वाढ त्यामुळे गाईड व जिप्सी वाहन चालक इत्यादी निसर्ग पर्यटन / जंगल सफारीशी संबंधित स्थानिक लोकांना योग्य मोबदला मिळावा इत्यादी याकरीता मा.मंत्री (वने) तथा अध्यक्ष व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान यांनी मान्यता दिल्यानंतरच सफारीकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येते.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील आदिवासींच्या जमीनी हस्तांतरण करण्यात होत असलेल्या विलंबाबाबत

**(१२) १४६३० (२५-०८-२०२२) श्री.सुरेश धस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १५ मधील प्रश्न क्रमांक ९८४१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हातील आदिवासींच्या जमिनी आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु असून याबाबतची १४ प्रकरणे कार्यवाहीत असल्याचे सांगितले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास,अद्याप सदर जमिनी प्रत्यार्पनाची प्रक्रिया जाणीवपपूर्वक रेंगाळली जात आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,लिंबागणेश (ता.बीड) येथील प्रकरणी जिल्हाधिकारी स्वाधिकारे कारवाई करण्यास विलंब करत असल्याने आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष वाढत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर जमीनी प्रत्यार्पणाबाबतची कार्यवाही सुरु करणेबाबत जिल्हाधिकारी, बीड यांचे स्तरावरुन संबंधित तहसिलदार, आष्टी व बीड यांना कळविण्यात आले आहे काय व त्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) आष्टी तालुक्यातील १३ प्रकरणांत सुनावणीची कार्यवाही पूर्ण झाली असून महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ चे कलम २ (१)(ब) व कलम ३ नुसार प्रकरणे निकालावर राखीव ठेवण्यात आली आहेत. तसेच, पुढील १५ दिवसांत अंतिम निर्णय पारित करण्याचे नियोजीत आहे.
तहसिलदार, बीड कार्यालयाकडील एका प्रकरणामध्ये सुनावणी झाली असून प्रकरण निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

---

## मौजे कासारी (ता.आष्टी,जि.बीड) येथे देवस्थान इनाम जमिनीमध्ये अनाधिकृत खडी क्रेशर,पेट्रोल पंप,मंगल कार्यालय उभारणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) १४६७४ (२५-०८-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कासारी (ता.आष्टी,जि.बीड) येथे देवस्थान इनाम जमिनीमध्ये अनधिकृत खडी क्रेशर,पेट्रोल पंप,मंगल कार्यालय उभे केलेले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरील बांधकामे करताना व प्रकल्प उभे करताना आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या नाहीत हेही खरे आहे काय,
(३) असल्यास,शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देवस्थान इनाम जमिनीवर सदर अनधिकृत प्रकल्प उभे राहात असताना शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे कासारी ता.आष्टी, जि.बीड येथील प्रश्नाधीन जमिनी या “मदतमाश इनाम” या धारणाधिकाराच्या जमिनी असून, या जमिनीवर ५ खडी क्रेशर, ०२ पेट्रोल पंप व ०१ मंगल कार्यालय असे एकूण ८ बाबी आहेत. त्यापैकी, दोन खडी क्रेशरच्या

जागेच्या संदर्भातील अकृषिक परवानगी बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बीड यांचेकडे दाखल असून सद्य:स्थितीत दोन्ही खडी क्रेशर बंद आहेत.

उर्वरित ६ बाबींच्या जमिनीच्या संदर्भात संबंधितानी सक्षम प्राधिकारी यांच्याकडून आवश्यक ती परवानगी घेण्यात आली आहे.

---

## पठार (ता.हिंगणा, जि.नागपूर) भागात वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे संरक्षण करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(१४) १४९८८ (११-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पठार (ता.हिंगणा, जि.नागपूर) भागात असलेल्या १४ गावांमधील शेतकऱ्यांची तीन हजार हेक्टर शेती वन्यप्राण्यामुळे पडीक असून या भागातील शेतकऱ्याचे दरवर्षी नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभाग वन्यप्राण्याचा बंदोबस्त करीत नसल्यामुळे, वन्यप्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्यामुळे तसेच वन्यप्राण्यांमुळे नुकसान झालेल्या पिकांची तुटपुंजी भरपाई मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतामध्ये पीक घेणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पठार भागामधील शेती भाग जंगल परिसरात असल्यामुळे हिस्त्र पशु, प्राणी शेतात घुसून शेतपिकांची नासाडी करीत आहे, याप्रकरणी वन विभागाकडे तक्रारी करुन कार्यवाही होत नसल्यामुळे शेतपिकांचे नुकसान व जीवितहानीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन प्राण्यांचा बंदोबस्त करणे, वन्य प्राण्यांपासून झालेली शेतपिकांची नुकसान भरपाई देणे व जंगल परिसरात तारेची कुंपण घालून सुरक्षा कवच निर्माण करणे तसेच पडीक राहणारी शेतजमीन पुन्हा वहीवाटी वापरण्यात येवून शेतीतील उत्पनाचा लाभ शेतकऱ्यांना होण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

पठार (ता.हिंगणा, जि.नागपूर) भागात असलेल्या १४ गावांमध्ये सन २०२१-२२ या कालावधीत वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान झाल्याच्या ३७ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यास रुपये २,५८,०००/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या अनुषंगाने पठार (ता.हिंगणा, जि.नागपूर) भागात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• जंगलाचे सिमेवर आवश्यक त्या ठिकाणी समतल जलशोषक चर खोदण्यात आले आहेत.

• मानव-वन्यप्राणी संघर्ष उदभविल्यास वन्यप्राण्यांपासून संक्षण करण्यांचे दृष्टीने सतर्क राहण्याकरीता ग्रामस्थांना माहिती देणे, भिंती पत्रके लावणे तसेच शाळा, ग्रामपंचायत तसेच शासकीय ईमारतींच्या भिंतीवर वन्यप्राण्यांचे चित्र काढून माहिती लिहीणे इत्यादी माध्यमांमार्फत जनजागृती करण्यात येते.

• वनालगत असलेल्या गावांमध्ये वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांमुळे अतिप्रसंग उद्भवील्यास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
• वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
• वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती.
• डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी गांडूळ खत प्रकल्प राबविण्यात आला आहे. तसेच महिलांकरीता बचत गटामार्फत कुटीरउद्योग चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## भूखंड कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्टने माझगाव (मुंबई) केलेला गैरव्यवहार

**(१५) १५१८० (२८-१२-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) येथील एक भूखंड कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्टला ९० वर्षाच्या भुईभाड्याने देण्यात आला असून सदर भूखंडाच्या भुईभाड्याची मुदत सन २००२ मध्ये संपुष्टात येऊनही कराराचे नुतनीकरण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्टने सन २०१० मध्ये यापैकी ४ हजार ५८१ चौरस मीटर (एक एकर) भूखंड शासनाची परवानगी न घेता मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स या खाजगी विकासकास विकण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाजारभावाप्रमाणे सदर भूखंडाची किंमत रुपये १६० कोटी एवढी असून शासनाच्या परवानगीने २५ टक्के अवर्जित रक्कम भरुन सदर ट्रस्टने विक्रीचा व्यवहार न केल्याने डॉ.अश्विनी जोशी, तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर व्यवहार बेकायदेशिर ठरवून फौजदारी कारवाईसाठी भायखळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू भूखंड शासनाच्या अधिनस्त असून जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतची सुनावणी प्रलंबित ठेवली असल्याची तक्रार तक्रारदार श्री.जयेश लटके यांनी केली असून या एक एकरपैकी पाऊण एकर भूखंड जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावा, अशी मागणी तक्रारदारांकडून गत अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तक्रारदाराच्या तक्रारीनुसार या अपिलावर सुनावणी प्रलंबित असताना जिल्हाधिकारी कार्यालयाने सन १९७१ पासून निर्धारण कर भरण्याची नोटीस दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्टला पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर नोटीसाच्या अनुषंगाने विकासकाने ट्रस्टच्या वतीने ही रक्कम त्याच दिवशी अदा केली असून महसूल विभागाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेताना एक एकरापैकी पाव एकर भूखंड शासकीय असल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) : (**१) व (२) अंशत: खरे आहे.

माझगांव महसूल विभाग येथील भूकर क्र.१२६ चे लिज होल्ड क्षेत्रापैकी ४७७५ चौ.वार क्षेत्र हे शासकीय भाडेपट्टयाचे असून शासनाने दिनांक १७/१२/१९१७ चे भाडेपट्टाकराराने The Secretary for State India in Council यांना दिनांक ०१/०९/१९०३ पासून ९९ वर्षाच्या मुदतीकरिता भाडेपट्टयाने दिली होती. सदर मिळकत The Women's Foreign Missionary Society Of The Methodics Episcal Church यांनी कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्ट यांना भाडेपट्टयाचे हक्क दिनांक २३/०८/१९१८ रोजी हस्तांतरीत केले. सदर मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ३१/०८/२००२ रोजी संपुष्टात आला आहे. तसेच, कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्टने भुकर क्र.१२६ या मिळकतीमधील ४५८१ चौ.मी. (१३९९ चौ.मी. भाडेपट्टा क्षेत्र, ३०८२.२३ चौ.मी. पेन्शन ॲण्ड टॅक्स व १०० चौ.मी. फ्री होल्ड् लँड) नोंदणीकृत खरेदीखत क्र.बबई-३/५१०४/२०१०, दिनांक २४/०५/२०१० अन्वये गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना विनापरवाना हस्तांतरीत केले आहे.

(३) होय हे खरे आहे.

कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्ट व मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांनी शासनाची परवानगी न घेता शासकीय मालमत्तेची विल्हेवाट लावल्याने कच्छी लोहाणा निवास गृह त्यांचे ट्रस्टी तसेच गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांचेविरुध्द जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून भायखळा पोलीस स्टेशन येथे FIR क्र.२३२/२०१६, दिनांक १६/०८/२०१६ अन्वये भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे Criminal application No.११७६/२०१६ दाखल केले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४), (५) व (६) हे खरे नाही,

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र.एस-३०/२५१८/प्र.क्र.७/ज-२, दिनांक ०१/१२/२०१८ अन्वये माझगाव महसूल विभागातील भुकर क्रमांक १२६ चा भाग असलेली १३९९ चौ.मी. क्षेत्राची शासकीय भाडेपट्टयाची मिळकत अटी व शर्तीचा भंग केल्याने शासनजमा करण्यात आली आहे. त्यामुळे सुनावणी प्रलंबित नाही. श्री.जयेश कोटक यांनी उपरोक्त १३९९ चौ.मी. क्षेत्राव्यतिरिक्त ३१८२.२३ चौ.मी. क्षेत्र सरकार जमा करण्याची मागणी केली आहे. सदरचे क्षेत्र ३०८२.२३ चौ.मी. पेन्शन ॲण्ड टॅक्स व १०० चौ.मी. फ्री होल्ड् लँड या धारणाधिकाराखालील असल्याने ते खाजगी आहे. त्यामुळे श्री.कोटक यांची मागणी मान्य करता येणे शक्य नाही.

(७) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनस्तरावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार महसूल व वन विभागाने सर्व संबधिताना सुनावणीची संधी देऊन दिनांक ०१/१२/२०१८ रोजीचे ज्ञापनाद्वारे माझगाव महसूल विभागातील भुकर क्रमांक १२६ चा भाग असलेली १३९९ चौ. मी. क्षेत्राची शासकीय भाडेपट्टयाची मिळकत अटी व शर्तीचा भंग केला असल्यामुळे शासनजमा करण्याचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार सदर मिळकतीचा रितसर एकतर्फी ताबा घेणेत येऊन मिळकत पत्रिकेवर महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करणेत आले. शासनाच्या दिनांक ०१/१२/२०१८

रोजीचे ज्ञापनास मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्रमांक १५०/२०१९ नुसार आव्हानीत केले असून, सद्य:स्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.

श्री.जयेश कोटक यांचे तक्रारीचे अनुषंगाने अर्जदार यांना दिनांक २४/०८/२०२२ रोजी सुनावणीची संधी देणेत येऊन तक्रारदाराचा अर्ज जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी निकाली काढला आहे.

---

## राज्यात पीक कापणी प्रयोग करण्यास तलाठ्यांनी नकार दिल्याबाबत

**(१६) १६०१२ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मुख्य सचिवांनी आदेश दिल्यानंतरही खरीप हंगामातील पीक कापणी प्रयोग करण्यास तलाठ्यांनी नकार दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक कापणी प्रयोग करण्यास तलाठ्यांनी दिलेल्या नकारामुळे पीक विमा योजना आणि अतिवृष्टी बाधितांना नुकसान भरपाईचा लाभ मिळण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक कापणी प्रयोग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) पीक कापणी प्रयोगांमध्ये येत असलेल्या अडचणींच्या संदर्भात तलाठी संघटनेने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांचे तलाठी, ग्रामसेवक व कृषी संघटनांसोबत झालेल्या चर्चेस अनुसरुन महसूल व वन विभाग दिनांक १८/१०/२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये पीक कापणी प्रयोगामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून सर्व संबंधित यंत्रणांना समप्रमाणात पीक कापणी प्रयोगाचे वाटप करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

त्यानुसार खरीप हंगाम २०२२-२३ करीता एकूण ७७७२४ पीक कापणी प्रयोगांचे नियोजन करण्यात आले. त्यापैकी ६५०९० इतके पीक कापणी प्रयोग पूर्ण झालेले आहेत.

---

## नागपूर विभागामध्ये आदिवासी समाजासाठी राबविण्यात आलेल्या दिवाळी निमित्त आनंदाचा शिधाचा लाभार्थ्यांना लाभ मिळलेल्या नसल्याबाबत..

**(१७) १७२९१ (२५-०३-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२-२०२३ मध्ये आदिवासी विभागाकडून आदिवासी समाज यांच्यासाठी दिवाळी निमित्त आनंदाचा शिधा अशी विशेष योजना राबविण्याची घोषणा केली होती,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत शिधा वाटप आणि इतर काही उपक्रमांचे आदिवासी विकास विभागाद्वारे नियोजन करण्यात आले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार राज्यातील नागपूर विभागामध्ये एकूण किती लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा आणि अन्य उपक्रमाद्वारे लाभ देण्यात आला,
(४) तसेच उक्त लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा आणि अन्य उपक्रमाद्वारे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) व (२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक ०४/१०/२०२२ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारकांना दिवाळीनिमित्त १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर खाद्यतेल या ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेल्या विशेष शिधाजिन्नस संचांचे वितरण ₹ १००/-प्रति संच या दराने करण्यात आले आहे.
(३) व (४) नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब तसेच वर्धा जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारक अशा एकूण २१,५६,२८९ शिधापत्रिकाधारकांना दिवाळीनिमित्त शिधाजिन्नस संचांचे वितरण करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## शिक्षकांची जीपीएफ खाती ऑनलाईन करणेबाबत

**(१८) १७३५५ (२५-०३-२०२३) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक आपल्या मासिक वेतनातून ६.५ टक्के रक्कम त्यांच्या जीपीएफसाठी कपात करतात हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जीपीएफ खात्यामध्ये कपात झालेल्या रकमेचा हिशोब शिक्षकांना वेतन पथक अधीक्षक कार्यालयाकडून नियमित दिला जात नसल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीपीएफ खाते शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ऑनलाईन करणेबाबत शिक्षकांकडून मागणी करण्यात येत आहे, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांची जीपीएफ खाती ऑनलाईन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यस, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील पूर्णवेळ मान्यताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे ठेवणे, हिशोब देणे, अग्रीम / परताव्याची देयके अदा करणे इ. बाबी म्हणजेच भविष्य निर्वाह निधीचे संपूर्ण कामकाज शालार्थ प्रणालीशी संलग्न करुन ऑनलाइन पध्दतीने करण्याबाबतचा निर्णय दिनांक १७/९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पहूर कसबे (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानदाराकडून धान्य देण्यापासून वंचीत ठेवले जात असलेबाबत

**(१९) १८२०७ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहूर कसबे (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानदाराकडून धान्य देण्यापासून वंचीत ठेवले जात असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास तेथील ग्रामस्थांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर दोषी दुकांनदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

मौजे पहूर कसबे, ता.जामनेर, जि.जळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य व इतर ग्रामस्थांनी तहसिलदार, जामनेर यांच्याकडे दिनांक १२/०१/२०२३ रोजी चेअरमन, वि.वि.सहकारी सोसायटी, स्वस्त भाव धान्य दुकान क.०४, मौजे पहूर कसबे व स्वस्त भाव धान्य दुकान क.९४, मौजे पहूर कसबे येथील रास्त भाव धान्य दुकानदारांविरुध्द तक्रार केली आहे, हे खरे असल्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव यांनी दिनांक १०/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरीक्षक, जामनेर यांनी दिनांक १९/०१/२०२३ रोजी चौकशी करून तहसिलदार, जामनेर यांच्याकडे अहवाल सादर केला आहे. सदर चौकशीमध्ये आढळून आलेल्या दोषांच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव यांनी दिनांक ८/०२/२०२३ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशान्वये चेअरमन, वि. वि. सह. सोसायटी, पहूर कसबे, स्वस्त धान्य दुकान क्र. ४ व स्वस्त धान्य दुकान क्र. ९४, मोजे पहूर कसबे, ता.जामनेर, जि.जळगांव यांच्या स्वस्त धान्य दुकानाच्या प्राधिकारपत्राची १००% अनामत रक्कम दिनांक १५/०२/२०२३ रोजी शासन सरकार जमा करण्यात आली व प्राधिकारपत्रातील अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईत महाराष्ट्र भवनाची उभारणी करण्याबाबत

**(२०) १८३११ (२५-०३-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई मध्ये महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी तत्कालीन सरकारकडून १०० कोटी रुपयांची तरतुद अर्थसंकल्पात करुनही शासनाकडून भूखंड निश्चित करण्यात आला नसल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र भवन उभारणीसाठी एमएमआरडीएने सिडकोला २६ कोटी रुपये अदा केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबईमध्ये अन्य राज्याचे भवन उभारणी करण्यासाठी शासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवी मुंबईतील आठ हजार चौरस मीटरचा व वाशी येथे सेक्टर ३०-अ येथे दोन एकरचा भूखंड महाराष्ट्र भवन उभारणीसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई मध्ये महाराष्ट्र भवन उभारणीसाठी जागा निश्चित करुन बांधकामास सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही. नवी मुंबई येथे महाराष्ट् भवन उभारण्यासाठी वाशी सेक्टर -३० अ, भूखंड क्र.११ ते १४ येथील ८३२२.९१ चौ.मी. जागा राखीव ठेवण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. नवी मुंबई येथे महाराष्ट् भवन उभारण्यासाठी वाशी सेक्टर-३० अ, भूखंड क्र.११ ते १४ येथील ८३२२.९१ चौ.मी. जागा राखीव ठेवण्यात आली आहे.

(५) सिडको प्राधिकरणास रुपये ३४.८२ कोटी इतकी रक्कम देय असून त्यापैकी रुपये ३४.३८ कोटी रक्कम सिडको प्राधिकरणास भरणा केला असून पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.